## आतील पानात

- जगद्गुरु तुकोबा अन आवली आईचं प्रेम...
- १४ फेब्रुवारी - काळा दिवस...
- महाराष्ट्र केसरी ठरले पदकाचे मानकरी, हर्षवर्धन, अमृताला कास्यपदक...

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १८४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.१४ फेब्रुवारी २०२५


## थोडक्यात

### धगधगत्या मणिपूरमध्ये अखेर राष्ट्रपती राजवट लागू

**दि.१३, मणिपूर :** गृहमंत्रालयाने मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केल्याचे जाहीर केले आहे. गेल्या काही दिवसांपासून मणिपूरमध्ये मोठ्या प्रणाणात जातीय हिंसाचार झाला आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. दरम्यान मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिल्याच्या काही दिवसातच राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सिंग यांनी मणिपूरमध्ये तब्बल २१ महिने जातीय हिंसाचार सुरू राहिल्यानंतर राजीनामा दिली होता. मणिपूरमधील हिंसाचारात जवळपास २०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे तर हजारो लोक विस्थापित देखील झाले आहेत. मणिपूरमध्ये मे २०२३ पासून मेतेई आणि कुकी-झो समुदायांमध्ये जातीय संघर्ष सुरू आहे. मणिपूरमध्ये यापूर्वी भारतीय जनता पक्षाच्या (भाजपा) नेतृत्वाखालील सरकार होते. नोव्हेंबर २०२४ मध्ये, कॉनराड संगमा यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल पीपल्स पार्टी (एनपीपी) ने एन. बिरेन सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर ९ फेब्रुवारी रोजी सिंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. भाजपाने बिरेन सिंग यांच्यानंतर मुख्यमंत्री पदाच्या दावेदारासाठी मतैक्य तयार करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र भाजपा नेतृत्वाला यामध्ये यश आले नाही. मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी काँग्रेस आणि इतर राजकीय विरोधकांकडून सातत्याने केली जात होती.

### जमिनीच्या वादातून चुलत भावाची हत्या!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, पुणे :** पुण्याच्या म्हाळुंगेमध्ये जमिनीच्या वादातून चुलत भावाने चुलत भावाची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी म्हाळुंगे पोलिसांनी संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे. अर्जुन कावडे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

कावडे यांची वडिलोपार्जित आठ एकर जमीन आहे. जमिनीवरून संशयित आरोपी आणि अर्जुन यांच्यात वाद होता. जमिनीचं प्रकरण न्यायालयात प्रलंबित होतं. त्याची सुनावणी आज १३ फेब्रुवारी रोजी होती. यासाठी अर्जुन कावडे हे बुधवारी मुंबईतून म्हाळुंगेच्या दिशेने येत होते. दरम्यान त्यांना मध्यरात्री आसखेड परिसरात गाठून त्यांची डोक्यात दगड घालून हत्या करण्यात आली आहे. त्यांना सुनावणीला पोहचू दिलं नाही. याप्रकरणी अर्जुन कावडे यांच्या चुलत भावाला म्हाळुंगे पोलिसांनी ताब्यात घेतल आहे. त्याच्याकडे सखोल चौकशी करण्यात येत आहे. २०२२ मध्ये अर्जुन कावडे यांना चुलत भावाने बेदम मारहाण केली होती. हत्येचा प्रयत्न केल्या प्रकरणी म्हाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. काही दिवसांपूर्वी अर्जुन कावडे यांनी आठ एकरपैकी दोन गुंठे जागा विकली होती. यावरून देखील त्यांच्यात वाद झाले होते. जागा विकण्याला चुलत भावाचा विरोध होता. याचा राग मनात धरून त्याने हत्या केल्याचा संशय पोलिसांना आहे. या घटनेप्रकरणी म्हाळुंगे पोलीस अधिक तपास करत आहेत. या हत्येच्या प्रकरणात आणखी कोण सहभागी आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत.

# हर्षवर्धन सपकाळ महाराष्ट्र काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, बुलडाणा :** सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत दमदार कामगिरी करणाऱ्या काँग्रेस पक्षाची नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत अत्यंत निराशाजनक कामगिरी झाली होती.

त्यानंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या जागी नवा प्रदेशाध्यक्ष निवडण्यात येणार असल्याच्या चर्चा होत्या. अखेर आज अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ यांनी नियुक्ती केली आहे. याचबरोबर मल्लिकार्जुन खरगे यांनी विजय वडेट्टीवार यांची महाराष्ट्र काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून नियुक्ती करण्यासही मान्यता दिली आहे. याबाबत अखिल भारतीय काँग्रेस समितीच्य अधिकृत एक्स अकउंटवर माहिती देण्यात आली आहे. दरम्यान अखिल भारतीय काँग्रेस समितीने एक पत्रक जारी केले असून, त्यामध्ये म्हटले आहे की, काँग्रेस अध्यक्षांनी हर्षवर्धन सपकाळ यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी तात्काळ प्रभावाने नियुक्ती केली आहे. मावळते अध्यक्ष नाना पटोले यांच्या योगदानाचे पक्ष कौतुक करतो. याचबरोबर काँग्रेस अध्यक्षांनी महाराष्ट्रातील काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून विजय नामदेवराव वडेट्टीवार यांची नियुक्ती तात्काळ प्रभावाने करण्यास मान्यता दिली आहे.



**कोण आहेत हर्षदर्धन सपकाळ?**

गांधी कुटुंबीयांशी जवळचे संबंध असलेले हर्षवर्धन पाटील २०१४ ते २०१९ या कालावधीत बुलडाणा विधानसभा मतदारसंघाचे सदस्य होते. त्यांनी बुलडाणा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. याचबरोबर गेल्या काही काळात त्यांनी पक्षासाठी राष्ट्रीय स्तरावरही काम केले असून, अनेक राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी पक्षासाठी विविध भूमिका पार पाडल्या आहेत.

**अखेरच्या क्षणी हर्षवर्धन सपकाळ यांच्या नावावर शिक्कामोर्तब**

विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या पराभवानंतर नाना पटोले यांनी प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर नवा प्रदेशाध्यक्ष कोण? याबाबत काँग्रेस वर्तुळात मोठी चर्चा सुरू होती. यामध्ये बंटी उर्फ सतेज पाटील, विश्वजीत कदम आणि विजय वडेट्टीवार यांच्या नावची चर्चा होती. मात्र, अखेरच्या क्षणी विदर्भातील चर्चेत नसलेले पण पक्षनिष्ठा आणि राहुल गांधी यांच्याशी थेट संपर्क असलेले हर्षवर्धन सपकाळ यांचे नाव पुढे आले. त्यांच्या नावावर एकमत झाल्यानंतर आज सकपाळ यांची नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून घोषणा करण्यात आली. दरम्यान सपकाळ यांनी निवडीनंतर विजय वडेट्टीवार यांनी, त्यांना संधी मिळाली असती तर ती उत्तमपणे पार पाडली असती, असे म्हटले आहे.

# पालघर तालुक्यातील वीज प्रश्न निकाली काढण्यासाठी ५० कोटींची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१३, पालघर :** पालघरकरांचा वीज प्रश्न निकाली काढण्यासाठी ५०कोटीची मागणी पालघर विधानसभा आमदार राजेंद्र गावित यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

यावेळी आमदार गावित म्हणाले की, पालघर तालुक्यातील वीज प्रश्न गंभीर होत चालला असून येथील लोकांना सुरळीत व अखंडित वीजपुरवठा व्हावा म्हणून हा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघावा याअनुषंगाने महावितरणाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली असता




सातपाटी, केळवे, वरोर, वासगाव, ओशरवीरा , पेठ,केळवेरोड, वांगर्जे, मुरबाड, पडघे, हालोली, धानिवरी, तारापूर अशा विविध गावातील ग्रामस्थ आपले अडचणीचे निवेदन घेऊन या बैठकीस उपस्थित होते त्यादरम्यान आम्ही तात्काळ कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन निहाय कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

परंतु, या बैठकीत महावितरणाच्या अधिकाऱ्यांकडून उक्त सर्व प्रश्न निकाली काढण्याच्या अनुषंगाने साधारण ५० कोटी रुपयांचा प्रस्तावित असणे आवश्यक असल्याचे निकष निघाला होता त्यानिमित्ताने आम्ही महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पालघरकरांच्यावतीने एक निवेदन दिले असता त्यावर त्यांनी ५० कोटी रुपयांचा निधीला तात्विक मान्य दिली असून लवकरच पालघर तालुक्यातील वीज प्रश्न निकाली निघणार असून यात विजेचे खांब, ट्रांसफार्मर, विद्युत तारा आदी वीज पुरवठा साहित्य मिळणार असून यातून पालघर मध्ये होणारा विजेचा लपंडाव कायमस्वरूपी बंद होईल आणि लोकांना सुरळीत वीज पुरवठा होईल अशी आशा आमदार राजेंद्र गावित व्यक्त केली आहे.

याप्रसंगी मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५० कोटी रुपयांची तात्विक मान्यता दिल्याने महायुतीचे पालघर विधानसभेचे आमदार राजेंद्र गावित यांनी आभार मानले असून यावेळी स्वरा युवा ग्रुपचे अध्यक्ष तुषार संखे उपस्थित होते.

# राजन साळवींचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, ठाणे :** रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर-लांजाचे माजी आमदार राजन साळवी यांनी शिवसेना ठाकरे गटाला धक्का देत उपनेतेपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर आज (बुधवार) साळवी यांनी काही कार्यकर्त्यांबरोबर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. ठाण्यातील आनंद आश्रम येथे हा कार्यक्रम पार पडला. राजव साळवी यांचा हा पक्षप्रवेश उद्धव ठाकरे यांच्यासाठी मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे.

शिवसेना पक्षात प्रवेश केल्यानंतर उपस्थित शिवसैनिकांना संबोधित करताना राजन साळवी म्हणाले की, मी स्वत:ला नशीबवान समजतो, कारण ही जागा पवित्र आहे. धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्पर्शाने ही जागा पवित्र झाली आहे. आज माझ्या दोन्ही डोळ्यांमध्ये अश्रु आहेत. एका डोळ्यामध्ये दु:ख अश्र आहेत. गेले ३८ वर्ष शिवसेना प्रमुखांच्या आशीर्वादाने शिवसेनेत काम करत असताना नगरसेवक, नगराध्यक्ष, शिवसेनेचा जिल्हाप्रमुख, २००९, २०१४, २०१९ या कालावधीत मी आमदार होऊ शकलो, त्यानंतर शिवसेना उपनेता झालो. या संपूर्ण वाटचालीत सर्वसाधारण कुटुंबातील सदस्य एवढ्या मोठ्या पदावर पोहचला आणि तो पक्ष मला आज मागे टाकून आता मला नवीन प्रवाहामध्ये यावं लागतंय. त्यामुळे माझ्या डोळ्यात नक्कीच दु:ख अश्रु आहेत. तर दुसर्या डोळ्यात आनंद अश्रु आहेत, कारण कुटुंबातील सदस्य म्हणून भाईंनी (एकनाथ शिंदे) माझ्यावर प्रेम केलं. २०२२ पर्यंत भाईंनी मला कुटुंबातील एक छोटा भाऊ म्हणून मार्गदर्शन केलं. एक दु:ख नक्कीच आहे की अडीच वर्षापूर्वी भाई मुख्यमंत्री होत असताना त्यांच्याबरोबर जाऊ शकलो नाही. ती त्या वेळची परिस्थिती असेल. पण निश्चितपणे त्यानंतरच्या काळात हा निर्णय घेतला आणि भाईंनी मला सामावून घेतले. हा आनंदाचा क्षण आहे, असे साळवी यावेळी बोलताना म्हणाले.

२०२४ साली मला पराभवाला सामोरे जावं लागलं, याला जबाबदार कोण? हा प्रश्न मी आपल्यासमोर मांडला आहे. २०१४ साली भाजपा सेनेची युतीची सत्ता आली आणि त्या युतीमध्ये मला वाटलं होतं की माझ्यासारखा निष्ठावंत मंत्री होईल म्हणून. एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंकडे माझी शिफारस केली होती, पण दुर्दैवाने होऊ शकलो नाही. पण शिवसेनेचे नेते विनायक राऊत यांनी त्यावेळी दीपक केसरकर यांना मंत्री केलं. राजन साळवी तिथंच राहिला. तो काळ गेला, २०२४ ची निवडणूक आली, तेव्हाही वाटलं होतं राजन साळवीला संधी मिळेल, मंत्री होईल. उदय सामंत शिवसेनेत आले आणि २०१९ ला मंत्री झाले, असे साळवी म्हणाले. २०२४ च्या निवडणुकीत आम्ही पराभूत झालो, पराभव मान्य केला. पण २०२४चा पराभव हा माझ्या कुटुंबाला आणि पदाधिकार्यांच्या जिव्हारी लागला, असेही राजन साळवी म्हणाले.

**साळवींची एकनाथ शिंदेंकडे विनंती**

गेले आठवडाभर राजन साळवींना विधानपरिषद देणार, महामंडळ देणार हे मीडियाच्या माध्यमातून सांगितलं जात आहे. पण भाईंना (एकनाथ शिंदे) मी एवढचं नम्रपणे सांगेल की, मला शिवसेना पक्षाच्या माध्यमातून सर्व काही मिळालं आहे. मला काही नको. मी अत्यंत समाधानी आणि आनंदी आहे. माझी फक्त एकच अपेक्षा आहे की, माझ्याबरोबर आलेले राजापूर लांजा मतदारसंघातील सर्व मतदार, माझे शिवसैनिक, माझे पदाधिकारी त्यांना योग्य तो सन्मान आणि योग्य त्या अनुषंगाने जे काही देता येईल ते द्यावे. माझ्यापेक्षा माझ्या पदाधिकाऱ्यांना सांभाळावे अशी विनंती करतो, असे राजन साळवी म्हणाले.

# वेशांतर करून घरफोड्या करणाऱ्या सराईताला बेड्या...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, पुणे :** पुण्यासह राज्यातील इतर शहरांमध्ये मध्ये रेकी करून आणि वेशांतर करत भर दुपारी घरफोड्या करणाऱ्या सराईत घरफोड्याला शिवाजीनगर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. तपासामध्ये पन्नासहून अधिक घरफोड्या उघड झाल्या असून वेगवेगळ्या प्रकारच्या ४९ किल्लयांसह त्याच्याकडून १७ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.हर्षद गुलाब पवार (वय ३१, रा. गुलाबनगर, घोटावडे फाटा, मुळशी) असे या अट्टल चोराचे नाव आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी गुरुवारी दिली. सहायक पोलीस आयुक्त साईनाथ ठोंबरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत या वेळी उपस्थित होते. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गेल्या वर्षी एका घरफोडी प्रकरणात गुन्हा दाखल होता. ४ फेब्रुवारी रोजी शिवाजीनगर पोलिसांचे पथक गस्त घालत असताना चोरीच्या गुन्ह्यातील संशयित आरोपी हा म्हसोबा गेट बस थांबा येथे थांबल्याची माहिती मिळाली. त्यानंतर सापळा लावून हर्षद पवार याला पोलिसांना ताब्यात घेतले. त्याच्याजवळ असलेल्या सॅकची तपासणी केली असता, त्यात सोन्या-चांदीचे दागिने आढळले. पोलिसांनी केलेल्या चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली देत अन्य ठिकाणी देखील रेकी करून घरफोड्या केल्याचे सांगितले.याप्रकरणी हर्षदला अटक केल्यानंतर, चौकशीत त्याच्याकडून शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत तीन, वारजे माळवाडी हद्दीत तीन, खडक हद्दीत दोन, विमानतळ हद्दीत दोन तर चंदननगर, बावधन आणि आळंदी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत प्रत्येकी एक अशा १३ घरफोड्या केल्याचे निष्पन्न झाले. वरिष्ठ निरीक्षक चंद्रशेखर सावंत, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी, सहायक पोलीस निरीक्षक संजय पांढरे, राजकुमार केंद्रे, उपनिरीक्षक अजित बडे, पोलीस हवालदार रूपेश वाघमारे, भाऊ चव्हाण, राजकिरण पचार, महावीर कलटे, सचिन जाधव, आदेश चलवादी यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**कारागृहातून बाहेर आल्यानंतर पुन्हा घरफोड्या !**

हर्षद पवार याला २०२३ मध्ये न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर त्याने पुन्हा घरफोड्या करण्यास सुरूवात केली. त्यापूर्वीच्या पोलीस तपासात हर्षद पवार याने पुणे, पिंपरी-चिंचवड यासह पुणे जिल्ह्यात ५१ घरफोड्या केल्याची माहिती समोर आली आहे.. पोलिसांनी त्याच्याकडून सोन्याचे दागिने, चांदी, घरफोडी करण्यासाठी वापरत असलेली कटावणी, स्क्रू ड्रायव्हर यासह वेगवेगळ्या कुलुपांच्या ४९ किल्लया असा १७ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# संपादकीय



## सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान

आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मरलीन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९२ वि जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५६ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे.

**सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

# जगद्गुरू तुकोबा अन आवली आईचं प्रेम....!

पाश्चिमात्य संस्कृती प्रमाणे सध्या प्रेम व्यक्त करण्याचे दिवसचालू आहे. वचन दिल्यापासून तर प्रेम माझं तुझ्यावर आहे म्हणेपर्यंत त्यात फुल दिवस, टेडी दिवस,चॉकलेट दिवस वगैरे वगैरे. परंतु माझ्या देशातील प्रेमाची संकल्पना खूप वेगळी आहे. प्रेम फक्त प्रेयसीवरच नाही तर,माझी भारतीय संस्कृती आईवर प्रेम करा, वडिलांवर प्रेम करा, मित्रांवर प्रेम करा, बहिणीवर प्रेम करा, पत्नी लेकरंबाळावर प्रेम करा हे शिकवते.एवढेच नाही तर,देशावर प्रेम करा. पारतंत्र्यात असताना आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी हसतहसत फासावर लटकणारे, देशावर भरभरून प्रेम करणारे क्रांतिकारक बघितले. असे कित्येक उदाहरणे माझ्या भारत देशातील आहे.प्रेमव्यक्तच करायला हवं असं नसतं ते स्वाभाविक असतं अव्यक्त निशब्द ही असतं...!अन रुसव्या फुगव्याची ही असतं मात्र त्यातही प्रेमाचा झरा खळखळून वाहत असतो..असंच रागावून, रुसून पण एकमेकांवर जीवापाड असणारं हे,तुकोबा अन आई आवलीचं प्रेम...! आपण रोमियो- ज्युलियट, हीर-रांझा,लैला -मजनू ह्यांचे चित्रपट बघितले, पुस्तकात वाचले पण माझ्या तुकोबाचा अन आवली आईचं एकमेकांवरील प्रेम कधी वाचलं का? सामाजिक भान ठेवून, संस्कृति जपून,घरातील जबाबदाऱ्या सांभाळून काहीशी रागावून पण अत्यंत जिवापाड प्रेम करणाऱ्या आवलाईचे -तुकोबावरील प्रेम कधी विचारात घेतलचं नाही. तुकोबाची आवली केवळ रागीट, तापट अशी चित्रपट व लिखाणात दाखवली,परंतु तुकोबाच्या सर्व सुखदुःखात खंबीर उभी राहणारी अवली मात्र कुणी दाखवलीच नाही.

संत तुकोबांची पहिली पत्नी रुखमाई सततच्या आजार पणामुळे तुकोबाला कायमची सोडून गेली. मोठ्या भावाचा विरक्त स्वभाव. त्यामुळे त्यांचे संसारात व व्यवसायात मन रमत नव्हते. कुटुंबाची सर्व जबाबदारी तुकोबावर येऊन पडली. आई-बाबांच्या आग्रहाखातर तुकोबांचा विवाह पुण्याच्या गुळवे घराण्यातील जिजाबाई सोबत लावून दिला.तुकोबा जिजाईना प्रेमाने आवली म्हणायचे. विवाह नंतर काही दिवसातच आई-वडील तुकोबांना पोरके करून गेले.मोठा भाऊ घर सोडून गेला. कुटुंबाची खूप मोठी जबाबदारी तुकोबावर आली.अशा परिस्थितीत मात्र आवली आई तुकोबाच्या पाठीशी उभी राहिली. प्रत्येक संकटात सदैव साथ देणारी, सोळाव्या शतकातील खंबीर,संस्कार शील,समाजाचे संपूर्ण भान जपणारी तुकोबाची पत्नी आवला आई ..! केवळ मै तेरी, तू मेरा हे म्हणून खरं प्रेम ठरत नसतं,त्यासाठी जीवनातील सर्व सुखः दुःखाच्या प्रसंगी एकमेकांना एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावं लागतं. जगाला प्रेम शिकवणाऱ्या माझ्या जगदुरु तुकोबांची पत्नी स्वरूप प्रेयसी आवली तुकोबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिली. काही कालावधीत दुष्काळ पडला. कर्जाने ग्रासलेल्या लोकांचे तुकोबांनी कर्ज माफ केले. सर्व



कागदपत्र इंद्रायणीत बुडवले.जगाच्या पाठीवर शेतकऱ्यांचे विनाशर्त सरसकट कर्जमाफी करणारा मनाने महाश्रीमंत जगदुरु निर्धन झाला.या निर्धन तुकोबाची या काळातही आई आवलीने साथ सोडली नाही. क्षणभर रागावलीही असेल. तेअगदी रास्त होतं. कारण या अवलियाने सर्व सोनं, नाणं एवढंच काय घरातल्या कणगीतला धान्याचा शेवटचा कण सुद्धा भुकेल्यांना देतांना मागे पुढे पाहिलं नाही, अशा या दानशूर महाश्रीमंत संत तुकोबाची आवली तेव्हाही शांत होती आणि तुकोबाच्या पाठीशी खंबीर होती. याला काय म्हणावं? निस्सीम प्रेम..! या वासनेने बरबटलेल्या बाजारू प्रेमापेक्षा माझ्या जगदुरु अन माय अवलीच प्रेम किती महान आहे.

काही लेखक कवींनी आवलीआई रागीट,तापट लिखाणातून दाखवली. तुकोबाला त्रास द्यायची.एवढेच काय,काही महाशयांनी तर तुकोबाला ऊसाने मारायची हे सुद्धा लिहलं किती हे खालच्या दर्जाचे विचार? जी माऊली तुकोबाच्या सुखः दुःखात सदैव पाठीशी खंबीरपणे उभी राहते ती कसं वागू शकेल असं... कि ज्या तुकोबाच्या कीर्तनाने अन अभंगाने पंचक्रोशीतील हजारो लोकांना भक्तीचा अन अध्यात्माचा मार्ग दाखवला, स्वराज्य संस्थापक ज्यांचे चरण धरतात एकढेच काय प्रत्यक्ष भगवंत कीर्तनाला हजर राहून भक्तीत तल्लीन व्हायचे. जगद्गुरू तुकोबा संत नामदेवाचे उर्वरित कार्य करण्यासाठी, विठ्ठलाचे गुण गाण्यासाठी अन समाजप्रबोधनासाठी अभंग रचनेत व्यस्त असायचे,तर कधी विरक्त स्वभावामुळे भंडाऱ्या डोंगरावर नामस्मरणात तल्लीन राहायचे. वृक्ष,वेली वनातील पशु पक्षी यांच्याशी संवाद साधायचे. कारण तुकोबा हे आकाशाएवढे आहे.विशाल हृदयाचे आहे.संवादात अन पांडुरंगाच्या नामस्मरणात तल्लीन राहत. त्यामुळे एक-एक दोन -दोन दिवस कधी डोंगरावर ध्यानस्थ असायचे,तेव्हा अवलीआई तुकोबांसाठी अनवाणी उन्हा- तान्हात न्याहरी घेऊन येत असतांना,लाडक्या विठूरायाला हक्काने शिव्या घालत यायची. रस्त्याने पायात काटा रुतला तर प्रत्यक्ष भगवंत तिच्या पायातला काटा काढत असत कारण पहिलंअसं कि आवली आई अत्यंत प्रिय भक्ताला जेवण घेऊन जात होती तर दुसरं असं कि प्राणप्रिय सख्याला पती जगदुरुला संत तुकोबाला तहान भुकेने वाकुळ झाले असतील म्हणून जेवायला घेऊन जात होती. वा! किती हे आगळे वेगळे प्रेम! ते ही प्रत्यक्ष परमेश्वराच्या साक्षीने..!

तुकोबाचा वाढता लौकिक अन समाजातील वाईट चालीरीतीवर अभंगांच्या माध्यमातून घाला घातल्यामुळे मंबाजी सारख्या बुवाबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले. त्यामुळे तुकोबाला त्यांनी नहाक त्रास देण्याचा प्रयत्न केला, तेव्हा सुद्धा आवली आई सखा तुकोबा यांच्या पाठीशी पत्नी म्हणून खंबीर उभी राहिली. तुकोबाचेही आवलीआई वर तेवढंच निस्सीम प्रेम.! मात्र अव्यक्त, निशब्द...!

तत्कालीन समाज व्यवस्था लक्षात घेता शिक्षणाचा अधिकार फक्त उच्चवर्णीयांना होते, परंतु ही बहुजनाचं पोरग वेदाचा अभ्यास, लिखाण करतंय, त्यामुळे उच्चवर्णीयांनी तुकोबांना त्रास तर दिलास त्याचबरोबर त्यांनी रचलेली गाथा धर्मपीठाच्या आदेशानुसार इंद्रायणी नदीत बुडवण्याचे आदेश दिले. तुकोबांनी मान्य केले. गाथा इंद्रायणीत बुडवणार तेव्हा मात्र आवली आई अस्वस्थ झाली.तुकोबाच्या बाजूने पत्नी या नात्याने झालेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. कारण तुकोबा गाथा लहान मुलाप्रमाणे जपायचे. यांची जाणीव आवली आईला होती,कारण गाथेसाठी तुकोबांना अनेक गोष्टीचा त्याग करावा लागला होता. आणि याची एक पत्नी म्हणून आवलीआईला चांगल्या प्रकारे जाणीव होती. इंद्रायणीत गाथा बुडवल्यावर पंचक्रोशीतील गाथा प्रेमी, तुकोबांचे मित्रमंडळी बरोबर आवली आई चौदा दिवस अहोरात्र अन्न-पाण्याशिवाय तुकोबाच्या सोबत होती. किती हे अफाट प्रेम याची कल्पना येते.

शिवकालीन कुटुंब व समाज व्यवस्था लक्षात घेता नितीमूल्य जोपसल्या जायचे. जीवनात कितीतरी संकटं होते तरी कुटुंब व्यवस्था टिकून होती. पती पत्नी एकमेकांची साथ देत असत. आई आवली अन तुकोबाचेही तसेच. मात्र विकृत लेखकांनी आवली आईचा स्वभाव रागीट,तापट दाखवला. त्यांचा जीवनप्रवास वेगळ्या वर्णन नेऊन ठेवला.मात्र आवली आई आणि तुकोबाचे प्रेम त्यांनी दाखवलेच नाही.या वासनांध प्रेमापेक्षा कितीतरी हजारो पटीने शुद्ध,समर्पित प्रेम आवलीआई तुकोबांचे होते.

तुकोबांच्या विरक्त, वैराग्यवृत्तीच्या स्वभावामुळे काही अंशी कुटुंबाच्या गरजा भागवता आल्या नसतील. कधीकधी तारांबळ उडाली असेल. मात्र आवली आईने जगदुरू संत तुकोबाच्या संसाराचा गाडा अगदी यशस्वीरित्या ओढला. तुकोबाच्या सदेह वैकुंठ गमनापर्यंत...! तुकोबाच्या जीवन प्रवासामध्ये आई आवलीचे समर्पण, प्रेम त्यांच्याविषयीचा आदर या सर्व प्रसंगातून दिसून येतो.या पाश्चिमात्य संस्कारहीन,वासनांध प्रेमापेक्षा सामाजिक भान, संस्कारशील व परमेश्वराच्या साक्षीचं हे

**जगद्गुरू तुकोबा आवलीआईचे प्रेम.....!**
**राम कृष्ण हरी...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

## गुलाबफुला..

व्हॅलेंटाईन डे आला
धन्यवाद गुलाबफुला
व्यक्त कराया भावना
कसा तूचं पुढे आला

लाल पांढरा पिवळा
रंगाने असो कसला
स्नेहरूपे प्रत्येकांच्या
मनामनात तू ठसला

विविध रूपे प्रेमाची
रंग तुझा रे आगळा
गंध तुझा बेधुंद करी
आनंद देशी सकळा

जोडतोस मन मनास
संस्कृतीचा रे सोहळा
सुखाची करे उधळण
स्वतःहोतोस मोकळा

दुरावा करावया दूर
रस्ता लाभला भला
धन्यवाद द्यावे कसे
सांग फुला तूच मला

कोमेजून जाशी उद्या
आठवात राही भला
प्रेमाचे निर्माल्य न हो
अमर वर तो लाभला

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# १४ फेब्रुवारी - काळा दिवस

आतंकवाद हा आजमितीला साऱ्या जगाची डोकेदुखी बनला आहे. स्वातंत्र्यानंतर आजतागायत भारतावर अनेक दहशतवादी हल्ले झाले ज्यामध्ये सहस्रो निरपराध नागरिकांसह, कितीतरी पोलीस आणि सैन्य अधिकारी मारले गेले. १४ मार्च २०१९ या दिवशी पुलवामा येथे झालेला आतंकवादी हल्ला हा सुद्धा त्यापैकीच एक होता. भारतीय तरुण व्हॅलेंटाईन डेच्या गुलाबी वातावरणात रंगलेले असताना जम्मू काश्मीरच्या एका भागात देशासाठी कर्तव्य निभावताना देशाचे ४० तरुण सैनिक शहीद झाले तर शेकडो जण घायाळ झाले. या हल्याने अनेक कुटुंब उध्वस्त झाली. शहिद झालेल्या जवानांना समर्पित आणि या हल्याचा निषेध म्हणून भारत सरकारने १४ फेब्रुवारी हा दिवस यापुढे 'काला दिवस' म्हणून पाळण्याची घोषणा केली.

पुलवामा येथे या दिवशी दुपारी ३.१५ वाजता सीआरपीएफ जवानांचा एक ताफा जम्मू काश्मीर महामार्गावरून जम्मूहून श्रीनगरला चालला होता. या ताफ्यात ७८ वाहने आणि सुमारे २५०० सैनिकांची तुकडी होती. अवंतिपुराजवळील लेथपोरा येथे ताफा पोहोचताच स्फोटकांनी भरलेली एक कार ताफ्यातील एका बसला धडकली. ज्यामुळे प्रचंड मोठा स्फोट झाला. आदिल अहमद दार नावाचा २० वर्षाचा जैश ए मोहम्मद या आतंकवादी संघटनेचा तरुण ही कार चालवत होता. या स्फोटाची तीव्रता इतकी भयंकर होती कि ज्या बसवर ती धडकली त्या बसचे रूपांतर क्षणार्धात धातूच्या ढिगाऱ्यामध्ये झाले. आजूबाजूच्या वाहनांना आगी लागल्या. जैश-ए-मोहम्मद या आतंकवादी संघटनेने या हल्ल्याचे दायित्व स्वीकारले. आदिल अहमद दारचा त्यांनी एक व्हिडीओ प्रसारित केला ज्यामध्ये तो स्वतःला फ़िदायिन म्हणवून घेत आहे. या हल्ल्यानंतर देशभर संतापाची लाट पसरली. आतंकवादी आणि त्यांच्या समर्थकांवर यापुढे कोणतीही कारवाई करण्याचे स्वातंत्र्य देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी यांनी या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांना दिले. जगभरात आजतागायत जे आतंकवादी हल्ले झाले त्यातील सर्वात घातक हल्यांपैकी एक असा पुलवामा हल्याचा उल्लेख केला जातो. यंदाच्या १४ फेब्रुवारीला या घटनेला ६ वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हापासुन दरवर्षी हा दिवस हा देशभरात 'काळा दिवस' म्हणून पाळला जातो. आजमितीला किती तरुणांना या दिवसाविषयी माहित आहे.

जगातील अनेक देशांत १४ फेब्रुवारीला साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन डे' हा काही भारतीय सण नाही. तरीही तो देशभरात उत्साहाने साजरा केला जातो. तरुणांमध्ये या दिवसाची अधिक क्रेझ असते. या दिवसाला अधिक रोमँटिक करण्यासाठी वृत्तवाहिन्या, विविध चॅनल्सवर चालणारे डेलीसोप, बॉलिवूड कलाकार आणि त्यानिमित्ताने आपला व्यवसाय चालवणाऱ्या कंपन्या त्यामध्ये भर घालत असतात. भारतात या दिवशी प्रेमाच्या नावाखाली स्वैराचारच अधिक चालत असल्याचे मागील काही वर्षांतील घटनांवरून लक्षात आले आहे. या दिवशी गर्भनिरोधक साधनांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. हॉटेल्स, लॉज या दिवशी गजबजलेले असतात, यावरून प्रेमाच्या नावाखाली आपल्याकडे काय चालते हे लक्षात येईल. प्रेमाला आजतागायत भारतीय संस्कृतीने कधीच विरोध केलेला नाही. जगाच्या पाठीवरील निरपेक्ष आणि निस्सीम प्रेमाचे सर्वोत्तम उदाहरण द्यायचे झाल्यास भगवान श्रीकृष्ण आणि राधाराणी यांच्या नात्याचा उल्लेख करावा लागेल.

प्रेम म्हणजे काय हे जाणून घ्यायचे आहे त्याने एकदा तरी भागवत वाचावे. प्रेमाच्या नावाखाली या दिवशी चालणारा बाजार कित्येक मुलींचे आयुष्य उध्वस्त करतो. व्हेलेंटाईन डे नंतर पुढील २-३ महिन्यांत गर्भपात करून घेणाऱ्या अविवाहित मुलींचे प्रमाण कमालीचे वाढलेले असते. भारतीय संस्कृतीला न शोभणाऱ्या या दिवसाचे भारतात एव्हढे स्तोम कशासाठी ? १४ फेब्रुवारी या दिवशीचे भारताच्या दृष्टीने काय महत्व आहे हे आजच्या महाविद्यालयीन तरुणांना विचारल्यास त्यापैकी ९५ टक्के मुले तरी या दिवशी व्हॅलेंटाईन डे असतो हेच उत्तर देतील, कारण आपले देशाप्रतीचे प्रेम केवळ स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या वर्षातील दोन दिवशीच जागृत झालेले असते. तळपते ऊन, मुसळधार पाऊस आणि कडाक्याच्या थंडीतही समस्त भारतीयांच्या रक्षणासाठी सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या सैनिकांप्रती आपल्या प्रत्येकांत सद्भावना केव्हा जागृत होणार ? त्यांच्या त्यागाचे आणि बलिदानाचे मोल आपल्याला केव्हा कळणार ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# पंढरपूरचे पोलीस निरीक्षक टी.वाय मुजावर यांच्यासह सहकाऱ्यांना बेस्ट डीटेक्शन अवॉर्ड

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर** : पंढरपूर तालुका पोलिसांनी दरोड्याच्या गुन्ह्यात ३ आरोपींना योग्य दिशेने तपास करीत जेरबंद केल्याने तालुका पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय मुजावर यांच्यासह सहकाऱ्यांना गुरुवार, दिनांक १३ फेब्रूवारी २०२५ रोजी बेस्ट डीटेक्शन अवॉर्ड ने सन्मानित करण्यात आले आहे.

मध्य प्रदेश पासिंगची पिकप गाडी क्रमांक एम पी ०९एस३०१० या गाडीच्या चालकाला चाकूचा धाक दाखवून चालकाला लाथा बुक्क्याने मारहाण करून पिकप गाडी जबरदस्तीने चोरून एकूण ११ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज घेऊन पळून गेले होते.

सदर गुन्ह्यामध्ये आरोपीच्या वर्णनावरून एकूण तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले होते. त्यांनी सदरचा



गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी गोविंद लिंबा पवार वय २३ वर्ष राहणार अंकोली तालुका मोहोळ, निबालअहमद शेख वय २१ वर्ष राहणार चिंचोली तालुका पंढरपूर संच्या मिटकरी वय ३२ राहणार आंबे चिंचोली तालुका पंढरपूर असे तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून फिर्यादीचे दोन मोबाईल फोन एक पिकप गाडी क्रमांक एम.पी ०९एस ३०१० एकूण किंमत रुपये ११ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून आरोपींना अटक केली होती.

सदर गुन्हा घडले पासून काही तासात आरोपींना अटक करून गुन्हा उघडकीस आणण्याची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे नायचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर पीएसआय भोसले, हेडकॉन्स्टेबल गजानन माळी, विनायक क्षीरसागर, ए.एस.आय तोंडले, हेडकॉन्स्टेबल रोकडे पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी पोलीस कॉन्स्टेबल आवटी यांच्या पथकाने केली आहे.

# तिखोल येथील शेतकऱ्याच्या मुलीचे लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश

## दिप्ती ठाणगे यांची महसूल सहाय्यक पदी निवड

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील तिखोल येथील दिप्ती शामकांत ठाणगे - भोर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेतून मंत्रालय महसूल सहाय्यकपदी निवड झाली.

तिखोल सारख्या खेडे गावातून शिक्षण घेऊन तसेच अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत ठाणगे यांनी यश संपादन केले. तिचे पहिली ते पाचवी पर्यंतचे शिक्षण तिखोल येथिल जिल्हा परिषद शाळेत तर दहावीपर्यंतचे शिक्षण समता माध्यमिक विद्यालय तिखोल या ठिकाणी झाले. तसेच तीन वर्षांचा कृषी डिप्लोमा कोर्स संपदा ॲग्री पॉलिटेक्निक टाकळी ढोकेश्वर याठिकाणी झाले. तर पदवीचे शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथून झाले. यानंतर स्पर्धा परीक्षा देत तिने हे यश संपादन केले. दिप्ती ठाणगे हिच्या यशामध्ये तिचे आई वडील भाऊ बहीण तिचे पती व नातेवाईक मित्र परिवार यांचा मोठा वाटा आहे. तिच्या या यशाबद्दल टाकळी ढोकेश्वर सेवा



सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे साहेब, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, आदर्श गाव योजनेचे अध्यक्ष महेश पाटील, मोहनराव रोकडे, माजी सभापती अरुण ठाणगे, माजी सरपंच शिवाजी खिलारी, शिराज हवलदार, शरद झावरे, सर्जेराव जाधव, भोर यांनी अभिनंदन केले आहे.

# खापरखेडा येथे ब्रह्माकुमारी विद्यापीठाच्या शिव संदेश भवनाचे उदघाटन संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर** : नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे नवनिर्मित शिव संदेश भवनाचे उदघाटन राजस्थान माउंट अबूच्या कृषी व ग्रामीण विकास विभागाचे उपाध्यक्ष राजयोगी ब्रह्माकुमार राजू भाई आणि नागपूर उप-क्षेत्राच्या संचालिका राजयोगिनी रजनी दीदी यांच्या हस्ते झाले. यावेळी भगवान शिवाचा ध्वज फडकवून लोकार्पण करण्यात आले. कामठी सेवाकेंद्र संचालिका बी.के.प्रेमलता दीदी यांच्या हस्ते कार्यक्रमात उपस्थित पाहुण्यांचे स्वागत पगडी, तिलक, हार दुप्पटे देऊन करण्यात आले. याप्रसंगी खापरखेडा




केंद्राच्या उपक्रमांची माहिती देताना प्रेमलता दीदी म्हणाल्या की, शिव संदेश भवन हे भौतिक उर्जेचे ठिकाण असून साधकांना आध्यात्मिक उर्जेने भरण्याचे काम करेल असे सांगितले. सर्वांच्या सहकार्याने, शिव संदेश भवन शांती, स्वच्छता, एकता आणि सकारात्मक उर्जेचे ठिकाण म्हणून सर्वांना समर्पित करण्यात आले. परतवाडा येथील अविनाश भाई यांनी आध्यात्मिक गीत सादर केले. आमदार डॉ. आशिष देशमुख व माजी मंत्री सुनील केदार यांनी शिव संदेश भवनाला भेट दिली व शुभेच्छा दिल्या. यावेळी सरपंच, उपसरपंच, जिल्हा परिषद सदस्य आणि अनेक अधिकाऱ्यासह श्रीराम भाई ठाकूर, महेंद्र भाई ठाकूर, माउंट अविनाश भाई, विष्णू भाई बांबळ आदि उपस्थित होते.

नागपूर, कोराडी, सावनेर, परतवाडा, तुमसर, वरठी, मौदा, रामटेक, काटोल, कळमेश्वर, कामठी, कन्हान, खापा, तारसा, जिन्सी, नगरधन, भिलगाव आदि परिसरातील हजारो बंधू-भगिनीं कार्यक्रमाला उपस्थित होते. संगीता दीदी, सपना दीदी, नीरज भाई आणि इतर बंधू-भगिनींनी इमारतीच्या बांधकामात प्रयत्न केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनंदा बहीण, संगीता बहीण, प्रेरणा बहीण, कविता बहीण, रेखा बहीण, शीलू दीदी, वंदना दीदी, चंद्रकला दीदी, अरुणा दीदी या सर्वांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे संचालन बिदर सेवा केंद्राच्या ब्रह्माकुमारी सुनंदा दीदी यांनी केले.

# बांधकामासाठी टर्शिअरी ट्रिटेड पुनर्प्रकियाकृत पाण्याचा वापर करणे विकासकास बंधनकारक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, नवी मुंबई** : महानगरपालिका क्षेत्रात एकूण सात मलप्रक्रिया केंद्रे अत्याधुनिक एसबीआर तंत्रज्ञानावर सद्यस्थितीत कार्यान्वित आहेत. सर्व सांडपाण्यावर सातही मलप्रक्रिया केंद्रांमध्ये प्रक्रिया करण्यात येते. मलप्रक्रिया केंद्रांमधून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा अधिक प्रभावी वापर होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या ‘अमृत मिशन’ अंतर्गत, नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत कोपरखैरणे व ऐरोली येथे टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट (अल्ट्रा फिल्टरेशन अँड अल्ट्राव्हायोलेट बेस टेक्नॉलॉजी) उभारण्यात आले आहेत.

सदर द्विस्तरीय (सेकंडरी ट्रीटेड) प्रक्रियाकृत पाण्यावर त्रिस्तरीय (टर्शिअरी ट्रीटेड) प्रक्रिया करून, सदरचे पुनर्प्रक्रियायुक्त सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील, औद्योगिक संस्थांना पिण्याशिवाय इतर वापरासाठी पुरविण्यात येते.

नमुंमपा क्षेत्रामध्ये सद्यस्थितीत सिडकोनिर्मित धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाची कामे सुरु झालेली असून इतर खाजगी भूखंडावरील विकास कामेसुद्धा प्रगतीपथावर आहेत. सदर विकास कामांकरिता बहुतांशी पिण्यायोग्य पाण्याचा वापर होतो. सद्यस्थितीत पर्जन्यवृष्टीचे प्रमाण दिवसेंदिवस कमी



होत चालले असून पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू लागली आहे. त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये व पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन होण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेकडे मोठ्या प्रमाणात पुनर्प्रक्रियायुक्त पाणी उपलब्ध असल्याने पालिका क्षेत्रामध्ये नगररचना विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या विकास कामांच्या बांधकामासाठी यापुढे उपरोक्त त्रिस्तरीय (टर्शिअरी ट्रीटेड) पुनर्प्रकियाकृत पाण्याचा वापर करणे विकासकास बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

# मृद व जलसंधारण विभागात ६०१ अधिकाऱ्यांच्या नियुक्ती पत्राचे रिमोटद्वारे ऑन लाईन पद्धतीने वितरण

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, ठाणे** : राज्यात जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात आलेले जलयुक्त शिवार अभियान हे महत्वाकांक्षी अभियान आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्यात लोकसभागातून झालेल्या कामे ही जलक्रांतीच्या दिशेने पडलेले पाऊल आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मृद व जलसंधारण विभाग अंतर्गत आयोजित अधिकारी गट ब (अराजपत्रित) नियुक्ती पत्राचे (रिमोटद्वारे ऑन लाईन पदध्दतीने) वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते करण्यात आले. तर प्रातिनिधीक स्वरुपात सहा उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्ती आदेशाचे वितरण करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथील सभागृहात झालेल्या या समारंभास मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील, आयुक्त प्रकाश खपले यांच्यासह नवनियुक्त अधिकारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

जलसंधारण विभागामध्ये निवड झालेल्या या ६०१ अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ते म्हणाले, जलसंधारण विभाग हा शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवणारा विभाग आहे. या विभागाच्या परिवारामध्ये नवनियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांनी सामान्य माणूस व शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे ध्येय बाळगावे. शासनाच्या माध्यमातून सामान्यांची सेवा करण्याची आपणास संधी मिळाली आहे. या संधीचे सोनं करून जनसामान्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवावे असे ते म्हणाले. राज्यात ७५ हजार नोकर भरती करण्यास सुरुवात केले होती प्रत्यक्षात सुमारे १ लाख ५० हजार नोकर भरती होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# थोडक्यात

## छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पानगावमध्ये पानगाव फेस्टिवल

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१३, पानगाव (लातूर)** : मराठी माणसाच्या हृदयातील अनमोल ठेवा, व जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त मराठवाडा स्तरीय नृत्य स्पधेचे आयोजन करण्यात आले. या स्पधेमध्ये विजेत्या संघला तब्ब्ल १ लाख ५० हजार रुपयाचे रोख स्वरूपात पारितोषिक ठेवण्यात आले आहेत. अशी माहिती छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव समिती पानगावच्या वतीने सांगण्यात आले. तालुक्यात पहिल्याच वर्षी या मराठवाडा स्तरीय नृत्य स्पधेचे आयोजन करण्यात आले आहे. येथील गांधी चौकामध्ये या स्पधेची सुरवात दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात येणार असून या स्पधेतील विजेत्यासाठी समूह नृत्य मोठ्या गटासाठी खुला गट प्रथम पारितोषिक ५१ हजार ठेवण्यात आले आहे तर द्वितीय पारितोषिक ३१ हजार रुपये तर तृतीय पारितोषिक २१ हजार रुपये ठेवण्यात आले आहे. समूह नृत्य लहान गटासाठी प्रथम पारितोषिक २१ हजाराचे द्वितीय पारितोषिक १५ हजार रुपये तर तृतीय पारितोषिक ११ हजार रुपये ठेवण्यात आले आहे. या स्पधेसाठी मोठया गटासाठी प्रवेश फ्री ५०० रुपये तर लहान गटासाठी प्रवेश फ्री २५० रुपये असेल. या स्पर्धेत गीतांचा वेळ ७ मिनिट असेल. स्पधेचा निकाल परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल तरी या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त संघाने सहभाग नोंदवावा असे आवाहान करण्यात आले आहे.

## श्रीमलंग गडावर उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते महाआरती



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१२, अंबरनाथ (ठाणे)** : अंबरनाथ तालुक्यातील श्रीमलंग गड येथे माघी पौर्णिमेनिमित्त दरवर्षी प्रथेप्रमाणे आयोजित करण्यात येत असलेल्या श्रीमलंग मच्छिंद्रनाथांचे भक्तीभावाने दर्शन घेऊन मनोभावे महाआरती महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आली. हिंदूंची वहिवाट हीच मलंगगड मुक्तीची पहाट असा नारा देऊन वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली वंदनीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी हा उत्सव सुरू केला होता. बाळासाहेबांचा आणि आनंद दिघे साहेबांचा हाच वारसा पुढे नेत आम्ही सर्व शिवसैनिक आजही हा उत्सव तितक्याच उत्साहात आणि जल्लोषात साजरा करत असल्याचे मत यावेळी उपस्थित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाविकांशी संवाद साधताना व्यक्त केले. यावेळी आमदार राजेश मोरे, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, ठाणे ग्रामीण जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील, तसेच कल्याण, डोंबिवलीतील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी आणि असंख्य शिवसैनिक अन्य मोठ्या श्रद्धेने उपस्थित होते.

## ऑनलाइन फसवणूक करणारे ४ आरोपींना पोलिसांनी ठोकले बेड्या

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१२, मुंब्रा (ठाणे)** : ठाणे मुंब्रा पोलीस ठाणे येथे दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी एक महिला फिर्यादी यांना आरोपीत यांनी टेलिग्राम वरती मेसेज करून गुगल वर जाऊन विविध हॉटेल्स रेस्टॉरंट यांना रेटिंग रिव्ह्यू आणि कमेंट करण्याचे टास्क देऊन पैसे कमावण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांची चाळीस हजार रुपयाची फसवणूक केली होती. म्हणून मुंब्रा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक २६९/ २०२५ कलम ३१९ (२) ३१८ (४) बी. एन. एस. सह कलम ६६ क, ड आयटीआय अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता. नमूद गुन्ह्याच्या तपासात मुंब्रा पोलीस स्टेशनच्या सायबर पथकाने नमूद गुन्ह्यात वापरण्यात आलेले टेलिग्राम आयडी यांची माहिती प्राप्त करून त्याचे आयपीडीआर तसेच नमूद गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या अकाउंट ची माहिती प्राप्त करून त्यात रजिस्टर असलेले मोबाईल नंबर यांचे सी.डी.आर, आय.पी.डी.आर तसेच रजिस्टर ईमेल आयडी यांचे आयपीडीआर बाबत तांत्रिक माहिती प्राप्त करून दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी कुर्ला पश्चिम बुद्ध कॉलनी येथे जाऊन छापा टाकला असता सदर ठिकाणी ४ आरोपी मिळून आले व त्यांच्या ताब्यात ७ मोबाईल्स, ३७ एटीएम कार्ड, ३६ चेक बुक व ०३लॅपटॉप, ०३ पासबुक, १६ सिम कार्ड तसेच इतर साहित्य मिळून आले असून चारही आरोपींना नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. सदर आरोपींनी व त्यांचे साथीदार पाहिजे आरोपी यांनी टेलिग्राम द्वारे लोकांना टास्क देऊन सायबर फ्रॉड करीत असल्याचे मान्य केलेले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून आरोपी यांना रिमांडकामी मान्य न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

## अपहरण बालकाची पोलिसांनी केली सुटका

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१२, उल्हासनगर (ठाणे)** : दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी पोलीस निरीक्षक एस.एस.शिंदे नेम- बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई शहर यांनी उल्हासनगर पोलीस ठाणे येथे फोनद्वारे कळवीले की, बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्र. १५७/२०२५ भा.न्या.सं कलम १३७ (२) प्रमाणे दाखल गुन्हयातील अपहरीत बालक वय ५ वर्ष याचे गोरेगाव रेल्वे स्टेशन येथुन दि.११ जानेवारी २०२५ रोजी अपहरण झाले. गुन्हयाचे तांत्रिक तपासान्वये सदरचे अपहरीत बालक व आरोपित हे शिवाजी रोड मार्केट, शहाड फाटक उल्हासनगर परिसरात असल्याचे कळवुन सदर अपहरीत बालकाचा फोटो व दाखल गुन्ह्याची माहीती फोनद्वारे पाठविलेवर उल्हासनगर पोलीस स्टेशनच्या नेमणुकीतील पोउपनि/वाळके तसेच, बिट मार्शल १ चे पोहवा/ पी.डी.रूपवते व पोहवा/ ई.एम.पाटील हे लागलीच अपहरीत बालकाचा शोध घेणेकामी रवाना झाले असता त्यांनी अपहृत बालक व आरोपीत याचा महात्मा फुले चौक ते शहाड रेल्वे स्टेशन उल्हासनगर परिसरात शोध घेतला असता नमुद गुन्हयातील बालक हा इसम नामे १) करण रामथिरण कनोजीया रा. गोरेगाव मुबई २) धरमपाल रामकिषोर यादव रा.सध्या खोपोली रायगड, मुळ गांव - गौरहरी पो.कटैयाभारी ता.बलरामपुर राज्य.उत्तरप्रदेश यांचे सोबत मिळुन आल्याने त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. मिळुन आलेल्या अपहरीत बालकास व सोबत मिळुन आलेल्या आरोपींना उल्हासनगर पोलीस ठाणे येथे समक्ष बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे नेमणुकीतील पोहवा/ आझाद कादर शेख, पोशी/ नागसेन गौरीहर चौधरी यांचे ताब्यात सुखरूप रित्या पुढील तपासकामी देण्यात आले आहे. उल्हासनगर पोलिसांनी अत्यंत गोपनीयपणे व तत्परतेने केलेल्या कारवाईमुळे सदर ५ वर्षाच्या बालकाची सुटका झाल्याने सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.